सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्र. ४७[1]

महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते याबाबत अधिनियम

[राज्यपाल यांची मंजुरी मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्र भाग चार" मध्ये दिनांक ३० नोव्हेंबर, १९५६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द केलला]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश या अन्वये अनुकूलन, रुपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :-

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. (२५-४-१९७३) *

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१. (८-९-१९७५)*

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८. (१.४.१९७७) *

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५. (१.४.१९८१) *

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८. +

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२ (१.४.१९८१). ++

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०. (१.२.१९८२) *

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई राजपत्र, १९५६, भाग पाच, पृ. ३३८ (इंग्रजी) पहावे.

* अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

+ सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४८ हा, त्याची कलमे ५,७ व ९ वगळून दिनांक १ एप्रिल, १९८१ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल. कलमे ५,७ व ९ ही दिनांक १८ सप्टेंबर, १९८१ पासून म्हणजेच हा अधिनियम, **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात आली आहेत.

++ या अधिनियमाची कलमे १,२,४,५,६,७ व ८ ही दिनांक १ एप्रिल, १९८१ पासून अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल, आणि कलमे ३ व ९ ही दिनांक २९ डिसेंबर, १९८१ पासून अंमलात आली आहेत.

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.

[1][महाराष्ट्र विधानपरिषदेच्या] सभापतीचे व उप सभापतीचे आणि [1][महाराष्ट्र विधानसभेच्या] अध्यक्षांचे व उपाध्यक्षांचे वेतन व भत्ते आणि कित्येक इतर बाबी यांसाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, [2][महाराष्ट्र विधानपरिषदेच्या] सभापतीचे व उप सभापतीचे आणि [2][महाराष्ट्र विधानसभेच्या] अध्यक्षाचे व उपाध्यक्षाचे वेतन व भत्ते ठरविणे व यात यापुढे दिलेल्या कित्येक इतर बाबी यासंबंधी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव प्रारंभ. १. [3][(१) ह्या अधिनियमाला महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींचे व उप सभापतींचे व महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांचे व उपाध्यक्षांचे वेतन व भत्ते याबाबत अधिनियम असे म्हणावे.]

(२) तो, दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

व्याख्या. २. ह्या अधिनियमात, विषयास अगर संदर्भास काहीही प्रतिकूल नसेल तर,

(अ) "विधानसभा" म्हणजे [4][महाराष्ट्र विधानसभा];

(ब) "सभापती" व "उप सभापती" म्हणजे, विधानपरिषदेचे अनुक्रमे सभापती व उप सभापती;

(क) "विधानपरिषद" म्हणजे [5][महाराष्ट्र विधानपरिषद] ;

(ड) निवासी व्यक्तीच्या संबंधात "व्यवस्था" म्हणजे, शासनाला किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला देणे असलेली पट्टी व कर भरणे आणि वीज, गॅस व पाणी यांची तरतूद करणे;

(ई) "निवासस्थान" म्हणजे, नोकरवर्गाच्या राहाण्याच्या जागा आणि त्यांना लागून असलेल्या इतर इमारती व त्यांच्या जागा ;

---

१. सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १५, अनुसूचीअन्वये, अनुक्रमे "मुंबई विधानपरिषदेच्या" व "मुंबई विधानसभेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

२. वरील अधिनियमान्वये अनुक्रमे "मुंबई विधानपरिषदेच्या" व "मुंबई विधानसभेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

३. वरील अधिनियमान्वये पोट-कलम (१) बदलीदाखल करण्यात आले.

४. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई विधानसभा" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

५. वरील आदेशाअन्वये, "मुंबई विधानपरिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

(फ) "नियम किंवा आदेश" म्हणजे, या अधिनियमाअन्वये अनुक्रमे केलेले नियम किंवा दिलेले आदेश ;

(ग) "अध्यक्ष" व "उपाध्यक्ष" म्हणजे, विधानसभेचा अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष.

सभापती व अध्यक्ष यांचे वेतन.

३. सभापती व अध्यक्ष यापैकी प्रत्येकास [1] [[2][दरमहा रु.२५००] इतके वेतन] देण्यात येईल.

सभापती व अध्यक्ष यांचे वेतन.

४. (१) सभापती व अध्यक्ष यांपैकी प्रत्येकास, तो पदावर असेपर्यंतच्या संपूर्ण कालावधीत सभापती व आणि त्यानंतर लगतच्या पंधरा दिवसांच्या कालावधीत भाडे न आकारता मुंबई येथे फर्निचर यांची व इतर सुखसोयींनी सुसज्ज असलेले निवासस्थान वापरण्याचा किंवा अशा निवासस्थानाऐवजी [3][दरमहा रुपये २५०० या दराने घरभत्ता आणि त्याव्यतिरिक्त, त्याने मुंबईतील त्याच्या (राज्य शासनाने या अधिनिमाखाली पुरविलेल्या जागेव्यतिरिक्त असलेल्या) निवासस्थानासाठी त्याने वीज आकार व पाणीपट्टी यासाठी जो कोणताही खर्च केला असेल तर तेवढी रक्कम]या दराने घरभत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(२) या कलमाअन्वये पुरविण्यात आलेल्या कोणत्याही निवासस्थानाच्या व्यवस्थेच्या संबंधात खुद्द सभापती किंवा अध्यक्ष यांवर कोणताही आकार पडणार नाही.

(३) या कलमाअन्वये पुरविण्यात आलेली कोणतीही निवासस्थान फर्निचर वगैरेंनी सुसज्जित करण्याचा खर्च, राज्य शासन नियम करुन किंवा आदेश देऊन ठरवील अशा प्रमाणात असेल.

[4][(४) जेव्हा सभापती व अध्यक्ष यांना पोट-कलम (१) अन्वये घरभत्ता व इतर रक्कम देय असेल त्याबाबतीत, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीजकरुन त्यांच्या निवासस्थानाच्या संबंधात

---

१. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र.५१ च्या कलम २ अन्वये, "दरमहा १,१०० रुपये इतका पगार" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

२. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २५ अन्वये, "रुपये १८००" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला व सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ अन्वये "रुपये २०००" याऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

३. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४ अन्वये "रु.२५०" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

४. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४ अन्वये पोट-कलम (४) दाखल करण्यात आले.

राज्य शासन, कोणतीही भर घालण्याचे, त्यात फेरबदल करण्याचे, परिरक्षण करण्याचे, दुरुस्ती करण्याचे काम किंवा अन्य कोणतीही गोष्ट करण्याकरिता, कोणताही खर्च करणार नाही, आणि त्यासाठी कोणतीही रक्कम मिळण्याचा सभापतीस किंवा अध्यक्षास हक्क असणार नाही.]

सभापती व अध्यक्ष यांना द्यावयाचा आतिथ्य.

[१][४अ. सभापती व अध्यक्ष यांच्यापैकी प्रत्येकास दरवर्षी [२][दोन लाख रुपये] आतिथ्य भत्ता [३][म्हणून स्वाधीन करण्यात येईल]

सभापती व अध्यक्ष यांच्यासाठी वाहने.

५. (१) सभापती व अध्यक्ष यांच्या उपयोगाकरिता मोटारगाड्या व इतर योग्य वाहने वेळोवेळी राज्य शासनाने खरेदी केली पाहिजेत व पुरविली पाहिजेत. ती सुस्थितीत ठेवणे व दुरुस्त करणे यासंबंधी, याबाबत नियम करुन किंवा आदेश देऊन ठरविण्यात येतील अशा शर्तीवर ती पुरविली जातील. [४][तसेच राज्य शासनास, अशा रीतीने पुरविलेल्या प्रत्येक मोटारगाडी-करिता किंवा वाहनाकरिता शोफरच्या विनामूल्य सेवेची व्यवस्था करता येईल.]

प्रवास भत्ते व दैनिक भत्ते.

(२) त्याचप्रमाणे सभापती व अध्यक्ष यापैकी प्रत्येकास [५][त्याबातीत केलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा दरमहा दराने वाहनभत्ताही द्यावयास पाहिजे.]

[६][६. राज्य शासनाने याबात केलेल्या कोणत्याही नियमांस अधीन राहून, सभापती किंवा अध्यक्ष यांस --

(अ) (एक) पदग्रहण करण्यासाठी, मुंबईबाहेरील त्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापासून मुंबईपर्यंत केलेल्या प्रवासाबाबत, आणि

(दोन) पद सोडल्यावर मुंबईपासून त्याच्या मुंबईबाहेरील नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापर्यंत केलेल्या प्रवासाबाबत.

---

१. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ८ च्या कलम २ अन्वये कलम ४ अ सामाविष्ट करण्यात आला.

२. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ अन्वये 'पन्नास हजार रुपये' या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

३. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ च्या कलम ३ (अ) अन्वये "म्हणून देण्यात येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

४. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ५१ च्या कलम ४ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५. सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ अन्वये "रुपये १०००" या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

६. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी, कलम ६ बदली दाखल करण्यात आला.

स्वत:साठी व त्याच्या कुटुंबातील व्यक्तीसाठी आणि त्याच्या व त्याच्या कुटुंबाच्या सामानाची वाहतूक करण्यासाठी प्रवास भत्ता, आणि

(ब) सार्वजनिक कामासाठी त्याने केलेल्या दौऱ्यांबाबत प्रवासभत्ता व दैनिक भत्ता; मिळण्याचा अधिकार असेल.

स्पष्टीकरण - "मुंबई" या शब्दप्रयोगात राज्य शासनाने या कलमाच्या कारणासाठी नेमलेल्या कोणत्याही ठिकाणाचा समावेश होतो.]

वैद्यकीय मदत.

७. राज्य शासनाने केलेल्या नियमांस अथवा दिलेल्या आदेशांस अधीन राहून, सभापती व अध्यक्ष यथास्थिती, सभापतींच्या किंवा अध्यक्षांच्या बरोबर राहणाऱ्या किंवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या त्याच्या कुटुंबातील व्यक्ती ह्यांना राज्य शासनाने चालविलेल्या रुग्णालयात जागा मोफत मिळण्याचा व वैद्यकीय मदत व उपचार मोफत मिळण्याचा हक्क असेल.

स्पष्टीकरण - ह्या कलमाच्या प्रयोजनाकरिता "कुटुंबातील व्यक्ती"या संज्ञेचा अर्थ पती, पत्नी, मुलगा, मुलगी, वडील, आई, भाऊ व बहीण असा समजावा.

राज्य विधानमंडळाच्या अधिकाऱ्यांसाठी दूरध्वनीच्या सोयी.

[1][७-अ. (१) राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक अधिकाऱ्यास, तो पदावर असेल त्या मुदतीत, त्यांच्या निवासस्थानी किंवा त्यांच्या मतदार संघात त्याने निवडलेल्या कोणत्याही (राज्य शासनाने या अधिनियमान्वये पुरविलेल्या राहण्याच्या ठिकाणाव्यतिरिक्त असणाऱ्या) ठिकाणी राज्य शासनाच्या खर्चाने दूरध्वनी बसवून मिळण्याचासुध्दा हक्क असेल.

(२) राज्य विधानमंडळाच्या अधिकाऱ्याला पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या दूरध्वनीच्या बाबतीत, तो बसविण्याबद्दल, त्यासाठी ठेवावयाच्या प्रारंभिक ठेवीदाखल, भाडे खर्चादाखल, त्याच्या परिरक्षणादाखल आणि त्यावरुन केलेल्या सरकारी दूर-भाषितांदाखल व्यक्तिशः कोणताही आकार पडणार नाही.

(३) या कलमान्वये, ज्या महिन्यात दूरध्वनीची सोय पुरवण्यात येईल त्या महिन्यापासून राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक अधिकाऱ्यास दरमहा [2][रु. ६,००० इतकी] रक्कमही देण्यात येईल.

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४१ च्या कलम २ अन्वये कलम ७ अ समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९९७ चा महाराष्ट्र क्र.१० अन्वये, "रु.४०००" या मजकुरांऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला व सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ अन्वये "रु.४५००" ऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

[1][(४) जेव्हा राज्य विधानमंडळाच्या पदाधिकाऱ्याने पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही ठिकाणी स्वतःच्या खर्चाने दूरध्वनी बसवून घेतला असेल त्याबाबतीत - [2]दाखविलेले नाही.

(अ) अशा दूरध्वनीच्या संबंधातील दूरध्वनी भाडेखर्च राज्य शासनाकडून केला जाईल आणि अशा पदाधिकाऱ्याला अशा दूरध्वनीच्या बाबतीत दरमहा रु.६००० इतकी रक्कम देण्यात येईल. आणि;

(ब) जर असा पदाधिकारी अशा ठिकाणी निवासस्थान म्हणून रहात असेल आणि त्यास या अधिनियमाच्या तरतूदींद्वारे किंवा तद्अन्वये राज्य शासनाकडून वेगळा दूरध्वनी पुरविण्यात आला नसेल तर, अशा दूरध्वनीवरुन शासकीय कामासाठी केलेल्या दूरध्वनीसंबंधातील खर्च देखील राज्य शासनाकडून केला जाईल. .

स्पष्टीकरण - या कलमात [3][व कलम ८ मध्ये] राज्य विधानमंडळाचा अधिकारी म्हणजे सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष.

आगगाडीने किंवा आगबोटीने मोफत प्रवास. ८. [4] [6](१) [१ एप्रिल, १९८१ पासून] महाराष्ट्र अधिनियम २/९१ राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक अधिकाऱ्यास त्याबाबत नियमांद्वारे किंवा आदेशाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीन, ज्यामुळे त्यास एकट्याने कोणत्याही वेळी भारताच्या कोणत्याही भागात कोणत्याही [5][रेल्वेने पहिल्या वर्गाने किंवा यथास्थिति वातानुकुलीत टु-टियरने] महाराष्ट्राच्या कोणत्याही भागात आगबोटीने प्रवास करण्याचा हक्क मिळेल अशा सोयी पुरविण्यात येतील.

परंतु अधिकाऱ्यास, एकतर एकट्याने किंवा आपल्या विवाहसाथीसह किंवा आपल्या अज्ञान मुलांसह [6][किंवा सोबत्यासह] संयुक्तपणे किंवा आपल्या विवाह साथीसह व अज्ञान मुलासह [6][किंवा सोबत्यासह] संयुक्तपणे, भारताच्या कोणत्याही भागात, मग तो भाग राज्यातील असो किंवा राज्याबाहेरील असे, रेल्वेच्या

१. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ अन्वये पोट कलम (४) बदली दाखल करण्यात आले.

२. सन १९९७ चा महाराष्ट्र क्र.१० अन्वये, "रु.४०००" या मजकुरांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला व सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ अन्वये "रु.४५००" या मजकूराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

३. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र.५२ च्या कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र.७२च्या कलम ४ अन्वये कलम ८ बदलीदाखल करण्यात आले.

५. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ अन्वये "पहिल्या वर्गाने" या मजकूराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

६. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

पहिल्या वर्गाने प्रवास करता येईल. तथापि अशा अधिकाऱ्याने राज्याबाहेर प्रवास केलेले अंतर आणि त्याच्या कुटुंबातील व्यक्तींनी [1][किंवा सोबत्याने] राज्यात किंवा राज्याबाहेरील प्रवास केलेले अंतर हे, कोणत्याही वित्तीय वर्षी एकूण [2][तीस हजार किलोमीटरांपेक्षा] अधिक होता कामा नये.

स्पष्टीकरण - प्रवासाच्या अंतरासाठी असलेली [2][तीस हजार किलोमीटरची] कमाल मर्यादा मोजण्याच्या प्रयोजनासाठी अधिकाऱ्याने राज्याबाहेर केलेल्या प्रवासाचे किलोमीटर्स व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी [1][किंवा सोबत्याने] त्याच्या निवासस्थानापासून, मग ते राज्यातील असो किंवा राज्याबाहेरील असो, केलेल्या प्रवासाचे किलोमीटर्स हे वेगवेगळे मोजण्यात आले पाहिजेत.

(२) (अ) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर अधिकारी एक तर एकट्याने किंवा त्याच्या विवाहसाथीसह किंवा त्याच्या अज्ञान मुलांसह [1][किंवा सोबत्यासह] संयुक्तपणे किंवा त्याचा विवाहसाथी आणि अज्ञान मुले [1][किंवा सोबत्यासह] यांच्यासह संयुक्तपणे राज्यात किंवा राज्याबाहेर भारताच्या कोणत्याही भागात या कलमात तरतूद केल्याप्रमाणे रेल्वेऐवजी विमानाने प्रवास करीत तर त्यास, जणु काही यथास्थिति त्यांने किंवा त्या दोघांनी किंवा त्या सर्वांनी, [2][रेल्वेच्या पहिल्या वर्गाने प्रवास] केला होता असे समजून प्रवासासाठी असलेल्या [2][तीस हजार किलोमीटर्सच्या] मर्यादेस अधीन राहून, प्रवास भत्त्याची मागणी करण्याचा हक्क असेल. अशा बाबतीत, विमानाने केलेल्या प्रवासाचे भाडे आणि [2][रेल्वेच्या पहिल्या वर्गाचे प्रवास] भाडे यांतील फरकाची रक्कम अधिकाऱ्याला सोसावी लागेल.

(ब) ज्या बाबतीत उपरोक्तप्रमाणे एखादा अधिकारी एकतर एकट्याने किंवा त्याच्या कुटूंबातील व्यक्तींसह [1][किंवा सोबत्यासह] संयुक्तपणे, हा प्रवास राज्याबाहेर भारतातील कोणत्याही भागात, आगबोटीने किंवा मार्ग परिवहनाच्या बसने करील त्याबाबतीत त्याला, प्रवासासाठी असलेल्या [2][तीस हजार किलोमीटर्सच्या] कमाल मर्यादेच्या अधीन, राज्याबाहेरील भारताच्या कोणत्याही भागात प्रवास करण्यासाठी, तेवढ्याच अंतरासाठी [2][रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या प्रवासाच्या] भाड्यापेक्षा आगबोटीच्या प्रवासाचे भाडे किंवा बसचे भाडे कमी असेल तर, असे कमी भाडे मागण्याचा हक्क राहील किंवा जर आगबोटीच्या प्रवासाचे किंवा बसचे भाडे तेवढ्याच अंतराच्या [2][रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या प्रवास] भाड्यापेक्षा अधिक असेल तर, तेवढ्याच अंतराच्या रेल्वेचा पहिल्या वर्गाला प्रवास भाड्याची मागणी करण्याचा हक्क राहील आणि त्याला दोन भाडयांमधला फरक सोसावा लागेल.

---

१. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र.८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र.२ अन्वये "रेल्वेने प्रवास" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

(३) या कलमात ज्या बाबतीत राज्य विधानमंडळाच्या एखाद्या अधिकाऱ्याला त्याच्या विवाहसाथीसह संयुक्तपणे अज्ञान मुलांसह किंवा अज्ञान मुलांशिवाय [1][किंवा सोबत्यासह] प्रवास करण्याची सुविधा देण्यात आली असेल त्या बाबतीत, वरिष्ठ अधिकारी महिला असल्यास तिला प्रवासाच्या या सुविधांचा, वेळोवेळी तिच्या पतीसह किंवा त्याऐवजी कलम १२-अ च्या स्पष्टीकरणात व्याख्या केल्याप्रमाणे तिच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीस संयुक्तपणे वापर करण्याचा हक्क राहील.

[4][सभापती, उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांस राज्य विधानमंडळाचे सदस्य म्हणून वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क नसणे.]

९. राज्य विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते ठरविणाऱ्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यांत कोणताही मजकूर असला तरीही [2][सभापतीस, उप सभापतीस, अध्यक्षास, किंवा उपाध्यक्षास] [3][तो] विधानपरिषदेचा किंवा विधानसभेचा सदस्य असला तरी, कायद्यान्वये कोणतेही वेतन किंवा भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही.

उप सभापती व उपाध्यक्ष यांचे वेतन.

१०. उप सभापती व उपाध्यक्ष यांस [5][दरमहा [6][२३००] इतके वेतन] देण्यात येईल.

सभापती, उप सभापती, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना बैठक भत्ता देणे.

[7][१०अ. प्रत्येक सभापती, उप सभापती, अध्यक्ष तो अशा सभापतीच्या, उप-सभापतींच्या अध्यक्षांच्या किंवा यथास्थिती उपाध्यक्षांच्या पदावर असताना त्या कालावधीत [8][प्रतिदिनी रु.१५०] या दराने बैठक भत्ता मिळण्यास हक्कदार असेल.]

---

१. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र.८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र.२ च्या कलम ४(अ) अन्वये "सभापतीस व अध्यक्षास" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) अन्वये असा सभापती किंवा अध्यक्ष' या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४(क) अन्वये समासटीपेतील "सभापती व अध्यक्ष" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

५. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५१ च्या कलम ५ अन्वये "दरमहा रुपये ७५० इतका पगार" या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

६. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२५ च्या अन्वये "रुपये १६००" या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम हा ३२ अन्वये "रुपये १८००" ऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

७. कलम १०अ दाखल करण्यात आले.

८. सन १९६५ च्या महाराष्ट्र अधिनियम २५ अन्वये "रु.१००" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आल.

[1][११. (१) उप सभापतीस व उपाध्यक्षास प्रत्येकी, तो पदावर असेपर्यन्तच्या संपूर्ण मुदतीत आणि त्यानंतर लगतच्या पंधरा दिवसांच्या कालावधीत भाडे न आकारता मुंबई येथे फर्निचर व इतर सुखसोयींनी सुसज्ज असलेले निवासस्थान वापरण्याचा किंवा अशा निवासस्थानाऐवजी [2][दरमहा २५०० या दराने घरभत्ता आणि त्याव्यतिरिक्त, त्यांने मुंबईतील त्याच्या (राज्यशासनाने या अधिनियमाखाली पुरविलेल्या जागेव्यतिरिक्त असलेल्या), निवासस्थानासाठी त्यांने वीज आकार व पाणीपट्टी यासाठी जो कोणताही खर्च केला असेल तर तेवढी रक्कम,] यादराने घरभाडेभत्ता मिळण्याचा हक्क असेल.

उपसभापती व उपाध्यक्ष यांची निवासस्थाने.

(२) या कलमान्वये पुरविण्यात आलेल्या कोणत्याही निवासस्थानाच्या व्यवस्थेच्या संबंधात, व्यक्तिशः उपसभापती किंवा उपाध्यक्ष यांच्यावर कोणताही आकार पडणार नाही.

(३) या कलमान्वये पुरविण्यात आलेली कोणतीही निवासस्थाने, फर्निचर वगैरेंनी सुसज्जित करण्याचा खर्च, राज्य शासन नियम करुन किंवा आदेश देऊन ठरवील अशा प्रमाणात असेल.

[3][(४) जेव्हा उपसभापती व उपाध्यक्ष यांना पोट कलम (१) अन्वये घरभत्ता व इतर रक्कम देय असेल त्याबाबतीत, या अधिनियमाद्वारे किंवा तद्अन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल, ते खेरीज करुन त्यांच्या निवासस्थानाच्या संबंधात राज्यशासन कोणतीही भर घालण्याचे, त्यात फेरबदल करण्याचे, परिरक्षण करण्याचे, दुरुस्ती करण्याचे काम किंवा अन्य कोणतीही गोष्ट करण्याकरिता कोणताही खर्च करणार नाही आणि त्यासाठी कोणतीही रक्कम मिळण्याचा उपसभापती किंवा उपाध्यक्षास हक्क असणार नाही.]

११अ. (१) राज्य शासनाने, उपसभापती आणि उपाध्यक्ष यांच्या उपयोगासाठी मोटारगाड्या व इतर योग्य वाहने वेळोवेळी खरेदी केली पाहिजेत वा पुरविली पाहिजेत. ती सुस्थितीत ठेवणे व दुरुस्त करणे यासंबंधी याबाबत नियम करुन किंवा आदेश देऊन ठरविण्यात येतील अशा शर्तींवर ती पुरविली जातील. [4][तसेच राज्य शासनास अशारीतीने पुरविलेल्या प्रत्येक मोटार गाडीकरिता व वाहनांकरिता शोफरच्या विनामुल्य सेवेची व्यवस्था करता येईल.]

उप सभापती आणि उपाध्यक्ष यांच्यासाठी वाहने.

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२ च्या कलम ६ अन्वये, मूळ कलम ११ऐवजी कलमे ११ व ११-अ बदली दाखल करण्यात आली.

२. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम ४ अन्वये "प्रति महिना रु.१५०" ऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

३. पोट कलम (४) दाखल करण्यात आले.

४. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५१ च्या कलम ६ अन्वये, हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(२) उपसभापतीस व उपाध्यक्षास प्रत्येकी [1][त्याबातीत केलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा दरमहा दराने] वाहनभत्ताही द्यावयास पाहिजे.

[4][प्रवास भत्ते व दैनिक भत्ते .] [2][१२. [3]* * * राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांस अधीन राहून, उपसभापती किंवा उपाध्यक्ष यांस—

(अ) (एक) पदग्रहण करण्यासाठी, मुंबईबाहेरील त्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापासून मुंबईपर्यंत केलेल्या प्रवासाबाबत आणि

(दोन) पद सोडल्यावर मुंबईपासून त्याच्या मुंबईबाहेरील नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापर्यंत केलेल्या प्रवासाबाबत,

स्वत:साठी, त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी आणि त्यांच्या व त्याच्या कुटुंबाच्या सामानाची वाहतूक करण्यासाठी प्रवासभत्ता ; आणि

(ब) सार्वजनिक कामकासाठी त्याने केलेल्या दौऱ्यांबाबत प्रवासभत्त व दैनिक भत्ता ; मिळण्याचा हक्क असेल.

स्पष्टीकरण - "मुंबई" या शब्दप्रयोगात राज्य शासनाने या कलमाच्या कारणांसाठी नेमलेल्या इतर कोणत्याही ठिकाणाचा समावेश होतो.]

वैद्यकीय मदत. [5][१२-अ. राज्य शासनाने केलेल्या नियमांस अथवा दिलेल्या आदेशास अधीन राहून, उप सभापती आणि उपाध्यक्ष आणि यथास्थिती उपसभापती किंवा उपाध्यक्ष यांच्याबरोबर राहणाऱ्या व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांना राज्य शासनाने चालविलेल्या रुग्णालयात मोफत जागा मिळण्याचा व वैद्यकीय मदत व उपचार मोफत मिळण्याचा हक्क असेल.

स्पष्टीकरण. -- या कलमाच्या प्रयोजनाकरिता "कुटुंबातील व्यक्ती" या शब्दप्रयोगाचा अर्थ, पती पत्नी, मुलगा, मुलगी, वडिल, आई, भाऊ किंवा बहीण असा समजावा.]

---

१. सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२ च्या "दरमहा १०००रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

२. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२ च्या कलम ३ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १२ बदली दाखल करण्यात आला.

३. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२ च्या कलम ७ (अ) अन्वये "कलम ११ च्या तरतुदींस" हा मजकूर वगळण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) अन्वये उक्त कलमाच्या समासटीपेऐवजी ही समासटीप बदली दाखल करण्यात आली.

५. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२ च्या कलम ८ अन्वये, मूळ कलमाऐवजी कलम १२ अ बदली दाखल करण्यात आले.

[1][१२-ब. सभापतीस, अध्यक्षास, उपसभापतीस आणि उपाध्यक्षास, स्वीय सहायकाच्या सेवा विनामूल्य मिळण्याचा हक्क असेल, या प्रयोजनासाठी, यथास्थिती, सभापतीस, उपसभापतीस, अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास, कलम १३ खाली केलेल्या नियमाद्वारे किंवा काढलेल्या आदेशाद्वारे, विहत करण्यात येईल अशी अर्हता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, आपला स्वीय सहाय्यक म्हणून नेमता येईल. या बाबतीत करण्यात येतील अशा नियमास किंवा आदेशास अधीन राहून अशा रीतीने नेमलेल्या सहायकास राज्य शासनाकडून [2][दरमहा रु.५०००] एवढे नियत वेतन मिळेल.] स्वीय सहायक-विषयक सोय.

१३. [3][(१) राज्य शासनास, सभापती व अध्यक्ष यांच्याशी विचारविनिमय करुन या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता नियम करता येतील किंवा आदेश देता येतील. राज्य शासनाचा नियम करण्याचा व आदेश देण्याचा अधिकार.

(१-अ) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम किंवा दिलेले सर्व आदेश, ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर ठेवले पाहिजेत.]

(२) ह्या कलमान्वये केलेला कोणताही नियम किंवा दिलेला कोणताही आदेश, दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ या दिनांकाच्या अगोदर नसलेल्या अशा कोणत्याही दिनांकापासून भूतलक्षी प्रभावासह अंमलात येईल अशा रीतीने करता येईल किंवा देता येईल.

(३) ह्या कलमान्वये केलेले कोणतेही नियम किंवा आदेश, हे जणू या अधिनियमात समाविष्ट केले असल्याप्रमाणे परिणामक्षम असतील.

सन १९५२ चा मुंबई ८. १४. सन १९५२ चा मुंबई विधानपरिषदेच्या सभातींचे व उपसभापतीचे व मुंबई विधानसभेच्या अध्यक्षाचे व उपाध्यक्षाचे वेतन व भत्ते याबाबत अधिनियम, १९५२ [ज्यास यात यापुढे "सदरहू अधिनियम" असे म्हटले आहे] व जे प्रदेश दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ नंतर नवीन *मुंबई राज्याचे भाग बनतात त्या प्रदेशात निरसन.

---

१. १८ सप्टेंबर, १९८१ पासून अंमलात आलेला, सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४८ च्या कलम ५ अन्वये कलम १२-ब समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९९७ चे महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० अन्वये "रुपये २०००" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला व सन २००३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ अन्वये "रुपये २५००" हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ८च्या कलम ३ अन्वये मूळ पोट-कलम (१) ऐवजी पोट-कलमे (१) व (१-अ) बदली दाखल करण्यात आली.

* "मुंबई राज्याचे" या मजकुरात बदल केला जाणार नाही. [पहा : महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.]

किंवा त्यांच्या संबंधात त्या तारखेच्या लगतपूर्वी अंमलात असलेला, ह्या अधिनियमाच्या तरतुदींसारखा कोणताही कायदा, हे निरसित होतील :

मात्र अशा रीतीने सदरहू अधिनियम व कायदा निरसित करण्यात आला असला तरीही सदरहू अधिनियमान्वये केलेले कोणतेही नियम किंवा दिलेले कोणतेही आदेश, जेथवर ते ह्या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील व ते ह्या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमांद्वारे किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे अधिक्रमित करण्यात आले असतील त्याव्यतिरिक्त व अधिक्रमित करण्यात येईपर्यंत, ह्या अधिनियमाच्या तरतुदींन्वये करण्यात किंवा देण्यात आले आहेत असे समजले पाहिजे.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.